**दरपत्रक -**

क्र. इंगांशावैमवरुना/लाँड्री विभाग/ 796 /2025
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर
दिनांक - 3 /02/2025

प्रति,

-------------------------------------------

-------------------------------------------

-------------------------------------------

विषय – **कापड धुलाईचे दरपत्रक सादर करण्याबाबत...**

उपरोक्त विषयान्वये इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेला रुग्णालयातील कापड धुलाईची सेवा प्राप्त करुन घ्यावयाची आहे. त्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे. **यादी सोबत जोडली आहे.**

तरी आपणास कळविण्यात येते की, आपण इच्छुक असल्यास आपण आपले दरपत्रक सोबत दिलेल्या सहपत्रात विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहुन आपल्या फर्मच्या/संस्थेच्या नावाने **दिनांक 12 /02/2025 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत** सीलबंद लिफाप्यात **मा. अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर** या पत्त्यावर पाठवावे किंवा प्रत्यक्ष आणून द्यावे. अस्पष्ट असलेले दरपत्रक रद्द करण्यात येईल.

**अधिष्ठाता,**
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नागपूर

Scanned with CamScanner

List of Laundry Machines

| Sr. No. | Machine | Capacity | No. of machines |
|---|---|---|---|
| 1 | Washing Machine | 60 Kg. | 2 Nos. |
| 2 | Washing Machine | 120 Kg. | 1 Nos. |
| 3 | Hydro /Water Extractor | 25 Kg. | 2 Nos. |
| 4 | Hydro /Water Extractor | 50 Kg. | 2 Nos. |
| 5 | Dryer | 120 Kg. | 2 Nos. |
| 6 | Heater Roller Ironing Machine | 8 feet Length | 1 Nos. |
| 7 | Heater Roller Ironing Machine | 13 feet Length | 1 Nos. |
| 8 | Boiler | 300 Kg. | 1 Nos. |
| 9 | Water Softener | | |

Scanned with CamScanner

## अटी व शर्ती

१) कंत्राटदाराकडे कापड धुलाईकरीता सोबत जोडलेल्या सुची नुसार यंत्रसामुग्री (लॉन्ड्री प्लांट) असणे आवश्यक राहील.

२) कापड धुलाईबाबतचे धुलाई केंद्र नागपूर जिल्ह्यातील असावे. (गुमास्ता /परवाना प्रमाणपत्र सोबत जोडावे) तसेच जीएसटी प्रमाणपत्र व वार्षीक उलाढाल (Yearly Turnover) याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

३) कापड धुलाईबाबत **किमान २०० खाटांच्या शासकीय/निमशासकीय रुग्णालयातील लॉन्ड्री सेवेचा अनुभव असावा.** (सोबत कागदपत्रे जोडावे)

४) रुग्णालयातील कक्षातून मळकट कपडे घेवून जाणे व ते स्वच्छ धुवून प्रेस करुन रुग्णालयीन कक्षामध्ये पोहचविणे ही सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील व याबाबत होणारा वाहतूक खर्च कंत्राटदाराला सोसावा लागेल.

५) कंत्राटदाराने दरपत्रकाप्रमाणे प्रमाणित केलेले साहीत्य (साबन, डिटर्जन्ट) नुसार व नमुन्या नुसारच वस्त्रधुलाईची कामे दररोज करणे अनिवार्य राहील. तसेच धुवून आलेल्या कपड्याची गुणवत्ता तपासण्यात येईल. वस्त्र स्वच्छ ठरलेल्या गुणवत्तेनुसार नसल्यास कापड-चोपडची रक्कम अदा करण्यात येणार नाही.

६) कंत्राटदाराने यंत्र सामग्रीत बिघाड झाल्यास किंवा कोणत्याही कारणाने बंद झाल्यास कापड-चोपड धुण्याची पर्यायी व्यवस्था करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. कंत्राटदाराकडून कापड-चोपड वेळेवर धुवून पुरवठा न केल्याने जर स्थानिकरीत्या कामे करावी लागली तर झालेल्या खर्चाची अतिरीक्त रक्कम व भाडे दंडाच्या रक्कमेसह (प्रती दिन) ३ टक्के कंत्राटदराच्या प्रदानाच्या रक्कमेतून वसुल केल्या जाईल. किंवा तात्काळ भरणा करावा लागेल.

७) कंत्राटदारास रुग्णालयातील वस्त्रसाठी धुलाईकरीता नेल्यानंतर परत देतांना वस्त्रसंख्या नगाप्रमाणे मोजून घ्यावे लागेल. कापड-चोपडची तूट आल्यास भरपाई करुन द्यावी लागेल. कपडे जळल्यास /फाटल्यास /गहाळ झाल्यास त्याबाबतची वसुली शासकीय दरानुसार कापड-चोपडीची किंमत आपल्या देयकाच्या रक्कमेतून वसुल करण्यात येईल.

८) कंत्राटदार रुग्णांचे कापड चोपड दररोज सकाळी १०.०० वा. नियमीतप्रमाणे धुलाईकरीता घेवून जाईल. तसेच दुस-या दिवशी स्वच्छ धूवून व प्रेस करुन सकाळी ९.३० वाजेपर्यंत संबंधीत वार्डात पोहचवतील याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

९) कंत्राटदारास शासनाकडून किंवा या रुग्णालयाच्या प्रशासनाकडून भविष्यात प्राप्त होणारे निर्देश सुचना कंत्राटदारास बंधनकारक राहतील. कपडे धुलाईचा कंत्राट कोणतेही पुर्वसुचना न देता केव्हाही बंद करण्याचे अधिकारी या प्रशासनास राहील.

१०) कंत्राटदाराकडे उपलब्ध असणा-या यंत्रसामग्रीची तपासणी करण्याचे सर्व अधिकार प्रशासनाला राहतील. तपासणी अहवालानुसार प्रशासनास शिफारस किंवा नाकारण्याचे अधिकार राहतील.

११) कंत्राटदाराकडे कापड-चोपड ने-आण करण्याकरीता वाहने असणे बंधनकारक राहील व कापड-चोपड ने-आण करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१२) कंत्राटदाराकडे काम करीत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील.

१३) कंत्राटदाराकडे धुलाईसाठी स्वात:चे कर्मचारी वर्ग राहणे बंधनकारक राहील व त्यांचे वेतनभत्ते इतर व्यवस्था स्वतः कंत्राटदार करतील त्यांचे वेतनाची जबाबदारी रुग्णालयाची राहणार नाही.

१४) रक्ताने माखलेले (Soiled Linen) हायपोक्लोराईड ने धुणे आवश्यक आहे. तसेच संसर्ग टाळण्यासाठी धुलाइचे काम विभाजीत करुन (Separate) धुण्यात यावे.

१५) रुग्णालयात प्रवेश करतांना धुलाई सेवकांनी ओळखपत्र परिधान करणे आवश्यक राहील. ओळखपत्राशिवाय आढळून आल्यास त्यांना प्रवेश निशेध करण्यात येईल व आपल्याला ताबडतोब पर्यायी व्यवस्थाकरणे अनिवार्य राहील.

Scanned with CamScanner

१६) देयकाची रक्कम धनादेश /एन.ई.एफ.टी. द्वारे अदा करण्यात येईल तसेच अनुदान उपलब्ध नसल्यास किंवा प्रशासकीय अडचणीमुळे विलंब झाल्यास त्यावर अतिरीक्त रक्कम अथवा व्याज आकारता येणार नाही. तसेच त्यामुळे नेमुन दिलेल्या कामावर परिणाम होणार नाही या दक्षता घ्यावी लागेल.

१७) सदर कत्राट करीता नमुद केलेले दर हे एक वर्षाकरीता असावे तसेच त्यामध्ये सर्व प्रकारचे खर्च आणि लागू असलेले सर्व करांसहीत दर नोंदवावे. नमुद दराची एकुण रक्कम ज्या कंत्राटदारांची कमी असेल्या त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

१८) ज्या कंत्राटदारांची नमुद दरांची एकुण रक्कम कमी असेल त्यांच्याच लॉन्ड्री प्लांटची प्रत्यक्ष पाहणी करुन विहीत अटी व शर्तीनुसार असेल त्यांनाच कंत्राटाकरीता प्राधान्य देण्यात येईल.

१९) सदरची सेवा देतांना रुग्णालयातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्यांची भरपाई संबंधीत ठेकेदारास देय होणा-या रक्कमेतून वसुल केली जाईल.

वरिल १ ते १९ अटी व शर्तीचे पालन करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील तसेच प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा काही कारण न दाखविता नाकारण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, इंगांशावैमवरु यांनी राखुन ठेवलेला आहे यांची नोंद घ्यावी.

अधिष्ठाता
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, नागपूर

Scanned with CamScanner

# दरपत्रक

| अनु. क्र. | लिनन साहीत्याचे नाव | प्रति नग दर (सर्व करासहीत) Including all Taxes |
|---|---|---|
| 1 | बेडशिट | |
| 2 | ब्लैंकेट | |
| 3 | पेशन्ट कोट | |
| 4 | पेशन्ट पँट | |
| 5 | पेटीकोट | |
| 6 | ब्लाऊज | |
| 7 | पेशन्ट गाऊन | |
| 8 | ड्रॉ शीट | |
| 9 | पीलो कव्हर | |
| 10 | डॉक्टर कोट (O.T.) | |
| 11 | डॉक्टर पँट (O.T.) | |
| 12 | डॉक्टर मॅक्सी (O.T.) | |
| 13 | डॉक्टर गाऊन (O.T.) | |
| 14 | सर्जीकल टॉवेल | |
| 15 | होल टॉवेल | |
| 16 | ॲब्डॉमिनल शीट | |
| 17 | ट्रॉली कव्हर | |
| 18 | लेगींज | |
| 19 | टर्कीश टॉवेल | |
| 20 | नॅपकीन | |
| 21 | खिडकी पडदे | |
| 22 | दरवाजा पडदे | |
| 23 | पार्टीशन पडदे | |
| 24 | स्क्रीन सेट | |
| 25 | टेबल क्लॉथ | |
| | एकुण | |

Scanned with CamScanner